# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. २७ मे, २०२१

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

**बातमी -१**

जळगाव दि.२४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व फिरते लसीकरण केंद्र,जिल्हा आरोग्य विभाग,जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात आयोजित लसीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात ८० जणांचे लसीकरण करण्यात आले.

विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी, दैनिक वेतनिक आणि सुरक्षारक्षक यांच्यासाठी कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर लसीकरणाचा दुसरा टप्पा गुरूवार दि.२७ मे, २०२१ रोजी आयोजित करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन, प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.बी.व्ही.पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.मोहन पावरा, प्रभारी कुलसचिव डॉ.एस.आर.भादलीकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी एस.आर.गोहिल, प्रा.ई.वायुनंदन यांनी विद्यापीठात होत असलेल्या लसीकरणाबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी लस घेतल्यानंतर विद्यापीठातील कर्मचारी श्री. वासुदेव कोळी व निवृत्त कर्मचारी श्री. जमाले यांना प्रभारी कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन व प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.बी.व्ही. पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

लसीकरणासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुभाष बडगुजर, डाटा ऑपरेटर प्रदीप पाटील, आरोग्य कर्मचारी विकास धनगर, हितेश महाजन हे उपस्थित होते. शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ. किशोर पवार, विद्यापीठ अभियंता आर.आय.पाटील, सुभाष पवार, डॉ. सोमनाथ वडनेरे, अरूण सपकाळे, राजू सोनवणे, एस.बी. पाटील, बाळासाहेब पाटील, शेखर बोरसे, इत्यादींनी परिश्रम घेतले.

## बातमी -२

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील उन्हाळी सत्रातील माहे मे, जून, जुलै २०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षांचे अर्ज विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरण्यात येत आहे. सदर परीक्षा अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी परीक्षा फी संदर्भात अनुसरायची कार्यपध्दती कळविण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज शक्यतो डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकींगचा वापर करून भरावा. यु.पी.आय. द्वारा भरणा टाळावा असे कळविण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या अकांऊट मधून फी डेबीट झाली असेल परंतू परीक्षा अर्ज भरला गेला नसेल तर विद्यार्थ्यांनी पुन्हा फी भरण्याची आवश्यकता नाही. ३-४ दिवसात बँक जुळवणीनंतर ऑटो सबमीट होऊन अर्ज भरला जाईल. तरी विद्यार्थ्यांनी पुन्हा फी भरण्याची घाई करू नये.

परंतू तरी देखील विद्यार्थ्यांकडून पुन्हा फी भरली गेली असेल तर अशा विद्यार्थ्यांनी जादा भरलेली फी परत मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक, पीआरएन नंबर, ट्रँझेक्शन आय. डी., बँकेचे नाव, खाते क्रमांक, आयएफसी कोड, भरलेली रक्कम इ. माहिती सह refunds@nmu.ac.in या ईमेल आयडीवर मेल करावा व बँक स्टेटमेंट ची स्कॅन कॉपी, एसएमएसचा स्क्रीन शॉट ईमेल सोबत जोडावा त्यामुळे पुढील कार्यवाही करता येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक बी.पी.पाटील यांनी दिली आहे.

## बातमी -३

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार कद. २९ मे, २०२१ रोजी कर्मवीर व्यंकटराव रणधीर व्याख्यानमाले अंतर्गत प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

रा.से.यो.चे माजी राज्य संपर्क अधिकारी राहिलेले डॉ. साळुंके हे समाज प्रबोधन या विषयावर बोलणार असून यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य दीपक पाटील अध्यक्ष राहतील. शनिवारी सायंकाळी ६.०० वाजता ऑनलाईन व्याख्यान होईल. यावेळी किसान विद्या प्रसारक संस्था शिरपूरचे अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, झेड. बी. पाटील महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष प्रा. सुधीर पाटील, रासेयोचे संचालक डॉ. पंकजकुमार नन्नवरे यांची ऑनीलाईन प्रमुख उपस्थिती असेल. याशिवाय प्राचाय पी.एच.पवार, उपप्राचार्य प्रा.व्ही.एस. पवार, डॉ. डी.के. पाटील हे देखील हजर राहतील. अशी माहिती महाविद्यालयाच्या रासेयोचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत कसबे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योगिता पाटील, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतिक शिंदे यांनी दिली आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू
(चंद्रकांत देव)
जनसंपर्क अधिकारी यांच्या करिता